# थोरात महाविद्यालयात ‘डेटा सायन्स’ला शासनाची मान्यता



**संगमनेर (प्रतिनिधी)–** बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या काळात विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे ज्ञान प्राप्त व्हावे, यासाठी माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी आ.डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शासनाकडून बी.एस्सी. डेटा सायन्स, एम.एस्सी. इन कॉम्प्युटर एप्लीकेशन तसेच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या वर्गाच्या अतिरिक्त तुकडीस मान्यता मिळाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांनी दिली आहे.

प्राचार्य वाघ म्हणाले, बदलत्या काळानुसार माहिती तंत्रज्ञान अत्यंत गरजेचे आहे. यामधील डेटा सायन्स हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून यासाठी महाविद्यालयाने अद्यावत प्रयोगशाळा देखील उभारली आहे. डेटा सायन्स सारख्या अभ्यासक्रमात पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देश-विदेशातील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या व्यापक संधी उपलब्ध होत आहेत.

अलीकडील बदलत्या काळात ए.आय. व डेटा सायन्स यांचा प्रभाव वाढत असून तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. आय.टी. क्षेत्र, उद्योग, व्यवसाय, बँकिंग, शेती, मेडिकल आदी क्षेत्रात ए.आय. आणि डेटा सायन्स सारख्या तंत्रज्ञानांचा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या या नवीन अभ्यासक्रमांसाठी संगमनेर शहर व परिसरातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले आहे. तसेच रोजगाराभिमुख, कालसुसंगत आणि करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध करून देणाऱ्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळाल्याने संस्थेचे मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब थोरात, अध्यक्ष डॉ. सुधीर तांबे, संस्थेचे सचिव सुमंत कोल्हे, सहसचिव बाबुराव गवांडे आणि रजिस्ट्रार उमेश डोंगरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ग्रामपंचायतींमध्ये योग सत्र

## सीईओ भंडारी : वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व पर्यावरणीय उपक्रम राबविणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)-२ अंतर्गत येत्या २१ जून रोजी होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम व विविध पर्यावरणीय उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांचे तसेच आयुष्मान आरोग्य मंदिरांचे सहकार्य घेतले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

QR Code 1 (Registration portal - Yoga Sangam)

QR Code 2 (Information Collaterals - Yoga Sangam)

QR Code 3 (Information Collaterals - Harit Yoga)

‘योग संगम’ या विशेष उपक्रमांतर्गत २१ जून रोजी सकाळी ६.३० ते ७.४५ या वेळेत प्रमुख योग सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. हे सत्र पंतप्रधानांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम् (आंध्रप्रदेश) येथून आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमाशी समांतरपणे होईल. या उपक्रमातून योगप्रात्यक्षिकांची परंपरा व जनसहभाग वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्थानिक स्तरावर योग सत्राचे आयोजन करण्यात येईल. यावर्षीचा मुख्य थीम योग, आरोग्य आणि वॉश (पाणी, स्वच्छता व आरोग्य) असा असून, संबंधित उपक्रम जल जीवन मिशन किंवा स्वच्छ भारत मिशन-२ अंतर्गत तयार केलेल्या पायाभूत सुविधांजवळ आयोजित करण्यात येतील. या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित परिसराची स्वच्छता, लाभार्थ्यांच्या बैठका, योग सत्रांचे आयोजन, व त्याचे छायाचित्र व दस्तऐवजीकरण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी सर्व संबंधित घटकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, तसेच या कार्यक्रमांचा जिल्हास्तरावर व्यापक प्रसार करावा, असे आवाहन केले आहे.

- कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी समित्यांनी क्यूआर कोड १ स्कॅन करून मानक कार्यप्रणाली, तर क्यूआर कोड २ स्कॅन करून संदर्भ साहित्य प्राप्त करावे, असे निर्देशही देण्यात आले आहेत. या वर्षीच्या योग दिन उपक्रमांत ‘हरित योग’ या विशेष संकल्पनेचा समावेश करण्यात आला आहे. पारंपरिक योगसत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा आणि पर्यावरणपूरक विविध उपक्रम यांचा यामध्ये समावेश असेल. यासाठी क्यूआर कोड ३ स्कॅन करून आवश्यक माहिती प्राप्त करता येईल.

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिंदी सक्तीवरील टाकला पडदा

**पुणे (प्रतिनिधी)–** हिंदी भाषेच्या सक्तीवरून सुरू असलेल्या वादावर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. काल (मंगळवार) काढण्यात आलेल्या नवीन जीआरमध्ये (शासकीय अध्यादेश) मअनिवार्यताफ हा शब्द काढून टाकण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीसांनी देहू येथे प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली. यामुळे हिंदी सक्तीची भीती दूर झाली असून, आता कोणतीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकता येणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

फडणवीस म्हणाले, यापूर्वी सरकारने हिंदीला अनिवार्य केले होते, मात्र नव्या धोरणानुसार काल जारी करण्यात आलेल्या जीआरमध्ये ही अट रद्द करण्यात आली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाने तीन भाषांचे सूत्र स्वीकारले आहे. या सूत्रानुसार, मातृभाषा शिकणे अनिवार्य असेल. मातृभाषेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना आणखी दोन भाषा शिकाव्या लागतील, ज्यापैकी एक भाषा भारतीय असणे बंधनकारक आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी फक्त दोन भाषा ठेवाव्यात अशी मागणी केली होती. मात्र केंद्र सरकारने तीन भाषांचे सूत्र कायम ठेवल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**मराठी भाषेच्या सक्तीवर कोणतीही तडजोड नाही**

या संपूर्ण वादंगाच्या केंद्रस्थानी असलेल्या मराठी भाषेच्या सक्तीबाबत मुख्यमंत्र्यांनी ठाम भूमिका मांडली आहे. कुठल्याही प्रकारची शाळा असो, मराठी अनिवार्यच असेल, त्याला पर्याय नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले. याचा अर्थ, राज्यातील कोणत्याही शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला मराठी भाषा शिकणे बंधनकारक असेल.

या नवीन निर्णयामुळे हिंदी भाषेच्या सक्तीवरून निर्माण झालेला वाद संपुष्टात आला असून, विद्यार्थ्यांना आता तिसरी भाषा निवडताना अधिक लवचिकता मिळणार आहे. ज्या विद्यार्थ्याला जी भारतीय भाषा शिकायची असेल, ती तो शिकू शकेल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

## संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या भेटीच्या समुहशिल्पाचे लोकार्पण



मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते पुणे आळंदी पालखी मार्गावर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उभारलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या भेटीचे समूहशिल्प आणि संतसृष्टीचे लोकार्पण करण्यात आले. या संतसृष्टीत विविध संतांच्या जीवनावर आधारित विविध भित्तीचित्रे बसविण्यात आली आहेत. संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपान महाराज, संत निवृत्ती महाराज, संत मुक्ताबाई व इतर वारकरी २० असे एकूण २५ शिल्पे मिश्र धातूमध्ये बनविण्यात आली आहे. सदर जागेत विविध संतांच्या जीवनातील प्रसंगांवर आधारित एकुण ४७ कांस्य धातुच्या शिल्पांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. या कामावर ३० कोटी ६९ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र एक्सप्रेसचं रुपडं पालटलं! एलएचबी कोचसह नव्या रूपात धावणार

**कोल्हापूर–** गोंदिया महाराष्ट्र एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. या गाडीतून प्रवास करणे आता अधिक आरामदायक आणि आनंददायी होणार आहे. तब्बल ५४ वर्षांनंतर महाराष्ट्र एक्सप्रेसचं रुपडं पालटलं आहे. १ नोव्हेंबर १९७१ पासून धावणारी ही ट्रेन आता १ जून २०२५ पासून लिंक हाफमन बूश (एलएचबी) कोचसह धावणार आहे. मध्य रेल्वेच्या आधुनिकीकरण योजनेंतर्गत हा बदल करण्यात आला असून या नव्या रूपात महाराष्ट्र एक्सप्रेस आता प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव देईल.

**अशी असेल ट्रेनची रचना**

महाराष्ट्र एक्सप्रेसच्या नव्या रचनेत १ द्वितीय वातानुकूलित कोच, ४ तृतीय वातानुकूलित कोच, ८ स्लीपर कोच, ५ सामान्य द्वितीय श्रेणी कोच आणि १ जनरेटर कार यांचा समावेश आहे. मात्र, या गाडीत पॅन्ट्री कारची सुविधा नाही. एलएचबी कोचमुळे ट्रेन अधिक मजबूत, सुरक्षित आणि आरामदायी झाली आहे. यात सुधारित आसन व्यवस्था आणि कमी ध्वनी प्रदूषण यांसारख्या सुविधा आहेत. यामुळे प्रवासाचा दर्जा वाढेल.

**१२ जिल्ह्यांना जोडते महाराष्ट्र एक्सप्रेस**

ही ट्रेन कोल्हापूर छत्रपती शाहू महाराज टर्मिनस येथून दररोज दुपारी २:४५ वाजता सुटते आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी ६:०० वाजता गोंदियाला पोहोचते. १३४९ किमीचा हा प्रवास १२ जिल्ह्यांतून आणि ६२ स्थानकांवर थांबत पूर्ण होतो. यात कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, जळगाव, अकोला, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया यांसारखी प्रमुख शहरं येतात. मिरज, कराड, बेलापूर, मनमाड, भुसावळ ही काही महत्त्वाची स्थानकं आहेत.

**एलएचबी कोचमुळे आरामदायी प्रवास**

मध्य रेल्वेने एलएचबी कोच लागू करून प्रवाशांच्या सुरक्षिततेला आणि सुविधांना प्राधान्य दिले आहे. जुन्या आयसीएफ रॅकच्या तुलनेत एलएचबी कोच अँटी-कोलिजन तंत्रज्ञान, सुधारित ब्रेकिंग सिस्टम आणि आधुनिक डिझाइनसह येतात. यामुळे अपघातांचा धोका कमी होतो. तसेच प्रवाशांना आरामदायी आसने, स्वच्छता, चांगली प्रकाशयोजना आणि कमी कंपन यांचा अनुभव मिळतो.

# प्रा. हनुमंत माने यांना बालगंधर्व परिवाराचा विशेष सन्मान पुरस्कार



**राहाता (वार्ताहर)–** बालगंधर्व परिवार महाराष्ट्र राज्य आयोजित बालगंधर्व रंगमंदिर वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या महोत्सवात साहित्यप्रेमी मंडळ सोमेश्वरनगर या साहित्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेच्या शारदा संकुलातील प्रा. हनुमंत माने यांना यंदाचा बालगंधर्व परिवाराच्या वतीने प्रेरणादायी भाषण कला प्रशिक्षक व प्रभावी वक्ता या कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

प्रा. हनुमंत माने यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मराठी भाषेचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे आणि संभाषण कौशल्य विकसित व्हावे यासाठी संभाषण कला प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले आहे. साहित्यप्रेमी मंडळ सोमेश्वरनगर या साहित्य संस्थेच्यावतीने गेल्या १७ वर्षात संपूर्ण महाराष्ट्रातील प्रतिभावंत कवींच्या निवडक कवितांचा सहभाग असलेल्या २१ प्रातिनिधिक कविता संग्रहाचे संपादक म्हणून त्यांनी भूमिका बजावली आहे.सामाजिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील विविध कार्यक्रमांचे बहारदार सूत्रसंचालन, निवेदन, व्याख्यानमाला, परिसंवाद, कार्यशाळा, चर्चासत्र व मुलाखत इत्यादी उपक्रमांचे यशस्वी आयोजन त्यांनी केले आहे. आजपर्यंत त्यांच्या या कार्यासाठी १३ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आलेला आहे. प्रा. हनुमंत माने यांना बालगंधर्व परिवाराचा विशेष सन्मान पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व साहित्य इत्यादी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची आमदारकी रद्द करण्याची मागणी; निकाल राखीव

**मुंबई–** दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची निवड अवैध ठरवून आमदारकी रद्द करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे यांनी केली आहे. त्यासाठी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात निवडणूक याचिकाही दाखल केली आहे. या याचिकेवर गुडधे यांच्या वतीने लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला असून, त्यानंतर न्यायालयाने याचिकेवरील निकाल राखूव ठेवला आहे. या निर्णयाकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

या याचिकेवर दोन्ही पक्षांकडून युक्तिवाद सादर करण्यात आले आहेत. यामध्ये फडणवीस यांनी याचिकेला जोरदार विरोध दर्शवला आहे. निवडणूक याचिका दाखल करताना खुद्द उमेदवाराची उपस्थिती आवश्यक असते. मात्र, याचिकाकर्ते गुडधे स्वतः गैरहजर होते, त्यामुळे ही याचिका फेटाळण्यात यावी, असा युक्तिवाद फडणवीस यांचे वरिष्ठ विधिज्ञ सुनील मनोहर यांनी यापूर्वीच्या सुनावणीत केला होता. सध्या या याचिकेवरील निकाल न्यायालयाने राखीव ठेवला असून, त्याकडे राज्याच्या राजकारणात उत्सुकतेने पाहिले जात आहे. त्यानंतर न्यायालयाने गुडधे यांना लेखी युक्तिवाद सादर करण्याची संधी दिली होती. या अनुषंगाने सोमवारी न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी पार पडली. यावेळी गुडधे यांच्यातर्फे वरिष्ठ विधिज्ञ मेहमूद प्राचा यांनी युक्तिवाद सादर केला. गुडधे यांनी ४ जानेवारी २०२५ रोजी वैयक्तिकरित्या न्यायालयात उपस्थित राहून ही याचिका दाखल केली होती. त्यांनी याचिकेवरील स्वाक्षऱ्या संबंधित लिपिक आणि नोंदणी अधिकाऱ्यांसमोर केल्या होत्या. मात्र, त्याच दिवशी सर्व औपचारिक प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती.

५ जानेवारी २०२५ रोजी रविवार होता, तर त्यानंतर ६ जानेवारीला गुडधे काँग्रेस पक्षाच्या एका महत्त्वपूर्ण बैठकीसाठी दिल्लीला गेले होते. त्यामुळे त्या दिवशी याचिका दाखल करण्याची प्रक्रिया त्यांच्या वकिलांनी पूर्ण केली, असे युक्तिवादात नमूद करण्यात आले. या युक्तिवादात ड. मेहमूद प्राचा यांना ड. आकाश मून आणि ड. पवन डहाट यांचे सहकार्य लाभले.

याशिवाय, दक्षिण नागपूरमधून विजयी झालेल्या गिरीश पांडव यांच्याविरुद्ध, चिमूर (चंद्रपूर) येथून निवडून आलेल्या भांगडिया यांच्याविरुद्ध सतीश वारजूरकर, बल्लारपूरमधून विजयी झालेल्या सुधीर मुनगंटीवार यांच्याविरुद्ध संतोषसिंग रावत आणि राजुरा मतदारसंघातून निवडून आलेल्या भोंगळे यांच्याविरुद्ध सुभाष धोटे यांनी निवडणूक याचिका दाखल केल्या आहेत. या सर्व याचिकाही समान निकषावर फेटाळाव्यात, अशी मागणी युक्तिवादादरम्यान करण्यात आली. दरम्यान, या सर्व याचिकांवरील निकाल न्यायालयाने सध्या राखून ठेवला आहे.

# अरण्यऋषी, ज्येष्ठ साहित्यिक मारुती चितमपल्ली यांचे निधन

**सोलापूर–** ज्येष्ठ लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षिशास्त्रज्ञ आणि वन्यजीव अभ्यासक मारुती चितमपल्ली यांचे निधन झाले आहे. त्यांना नुकताच पद्मश्री पुरस्कार मिळाला होता. पुरस्कार स्विकारण्यासाठी ते दिल्लीला गेले होते. त्यानंतर त्यांची तब्येत खालावल्याने ते आजारी होते. त्यांच्या निधनाने मराठीतील थोर साहित्यिक आणि पक्षीतज्ज्ञ गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

सोलापूर येथील त्यांच्या राहत्या घरी बुधवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ३० मार्च रोजी त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले होते. ते ९३ वर्षांचे होते. सोलापूरच्या गिरणी कामगारांच्या घरात जन्मलेल्या चितमपल्ली यांना त्यांच्या जंगल आणि पक्ष्यांविषयीच्या अभ्यासामुळे अरण्यऋषी म्हणून ओळखले जात होते. वनाधिकारी म्हणून सरकारी नोकरी करतानाच त्यांनी वन, वन्यजीव आणि पक्षीशास्त्र या विषयांवर विपुल लेखन केले. त्यांनी पक्षी कोष तयार करायला देखील स्वत:ला वाहून घेतले होते. एका ऋषीतुल्य व्यक्तीमत्वाचा सन्मान यंदा पद्म पुरस्कारानं करण्यात आला होता. मारुती चितमपल्ली यांनी सहा दशकांहून अधिक काळ मराठी लेखल, वन्यजीव संशोधन आणि पर्यावरण जागरुकता केली होती.त्यांनी मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदीही भूषवले होते. वन, वन्यजीव आणि पक्षीशास्त्र या विषयांवर २० हून अधिक पुस्तके त्यांनी लिहिली होती. मराठी आणि इतर भाषांमधील पक्षी, प्राणी (प्राणी कोष) आणि झाडे (वृक्ष कोष) आदी शब्दकोषांचे काम केले होते.

# माऊलींच्या पालखी सोहळ्याचे आज नेवाशातून प्रस्थान

**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** श्रीक्षेत्र नेवासा येथून देहू, आळंदी, त्रिंबकेश्वर प्रमाणे श्री संत ज्ञानेश्वर माऊली आषाढी पालखी सोहळा आज गुरुवार दि. १९ जून रोजी दुपारी ३ वाजता विठ्ठल आश्रम, गंगापूर येथील रामभाऊ महाराज राऊत व देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री संत ज्ञानेश्वर मंदिर येथून हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत प्रस्थान करणार आहे. श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या दिंडी सोहळ्याचा पहिला रिंगण सोहळा बसस्थानक येथे होणार आहे.

नेवासा आणि परिसरातील तालुके संभाजीनगर जिल्हा या ठिकाणावरून एकत्रित ३० दिंड्या आणि २५ ते ३० हजार भाविक यामध्ये सहभागी होणार आहेत.श्री संत ज्ञानेश्वर आषाढी माऊली पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी नेवासा नगरी सज्ज झाली आहे. नगरपंचायत प्रशासनाने पालखी मार्ग स्वच्छ केला आहे. पोलीस प्रशासनाने बंदोबस्ताची तयारी केली आहे, आरोग्य विभागानेही त्यांची यंत्रणा तयार ठेवली आहे.

# पुणतांबा-श्रीरामपूर रोडवरील जीवघेण्या खड्ड्यांकडे दुर्लक्ष



**पुणतांबा (वार्ताहर)–** पुणतांबा-श्रीरामपूर या १९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर काही ठिकाणी खोल खड्डे पडले आहे. या खड्ड्याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या श्रीरामपूर विभागाचे दुर्लक्ष असून अपघात झाल्यावर या विभागातील अधिकाऱ्यांना जाग येणार का? असा सवाल प्रवाशी वर्ग तसेच वाहन चालकांनी उपस्थित केला जात आहे. विशेषतः श्रीरामपूर च्या बाजूने बनाजवळ मोठा खड्डा पडला आहे तसेच खैरी व वीस चारीच्या दरम्यान काही खड्डे आहेत. ते तातडीने बुजविण्याची गरज आहे. सध्या रस्ता चांगला झाल्यामुळे श्रीरामपूर-पुणतांबा-कोपरगाव या राज्य मार्गावर रहदारी वाढली आहे. गोदावरी नदीपात्रातून बेकायदा वाळूचा उपसा करून वाहतूक करणारी डंपर, ट्रॅक्टर, अवजड वाहनांची वर्दळही याच रस्त्यावर वाढली आहे. सध्या विविध कारणामुळे ठिकठिकाणी हा रस्ता अरुंद झालेला आहे. काळाजी गरज म्हणून या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची गरज आहे.

## पान १ वरुन

## एक पास..वर्षभर प्रवास!

पास कुठे खरेदी कराल?

फास्टटॅग वार्षिक पास अधिकृत नाही फास्टटॅग पोर्टल किंवा तुमच्या फास्टटॅग जारी करणाऱ्या बँकेच्या वेबसाइटवरून खरेदी करता येऊ शकतो. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचा वापर करूनीही तुम्ही फास्टटॅग वार्षिक पास खरेदी करु शकता. अर्ज करण्यासाठी तुम्हाला तुमचा वाहन नोंदणी क्रमांक आणि मोबाइल नंबर आवश्यक असेल. ३,००० किमतीचा वार्षिक पास, एका वर्षासाठी सर्व राष्ट्रीय महामार्गांवर अमर्यादित प्रवास करण्यास अनुमती देतो.

## मनसेशी युती केल्यास फायदा होईल

घेईन, असे आश्वासन उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या माजी नगरसेवकांना दिल्याचे समजते. गेल्या काही दिवसांपासून मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. या सर्व पार्श्वभूमीवर काल ‘मातोश्री’वर पक्षाच्या माजी नगरसेवकांची बैठक उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी ठाकरे यांनी मनसेसोबत युती करायची किंवा कसे, याबाबत पक्षाच्या माजी नगरसेवकांकडे विचारणा केल्याचे समजते. यावर युती केली तर फायदाच होईल, असे मत माजी नगरसेवकांनी व्यक्त केल्याचे समजते. मुंबईत युतीला अनुकूल वातावरण असल्याचेही या माजी नगरसेवकांनी सांगितले. त्यावर मुंबई महानगरपालिकेसाठी आपल्याला ज्या पक्षासोबत युती करायची आहे वा कोणासोबत आघाडी करायची आहे त्यासंदर्भात तुम्हाला विश्वासात घेऊनच निर्णय होईल. तुम्ही सोबत राहिलात, तुम्ही निष्ठावंत आहात. येत्या काळात आपल्याला अनेक बैठका घ्यायच्या आहेत. येत्या ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये निवडणूक लागू शकते. त्यामुळे शिवसेना भवन येथे उपस्थित राहत सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी तुम्ही वेळ द्या. लवकरच शिवसेना भवन येथे आपण निवडणूक कार्यालय उघडणार आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितल्याचे कळते.

दरम्यान, या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना माजी नगरसेवक सुरेश पाटील म्हणाले की, आज मातोश्रीवर बैठक झाली. ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये निवडणूक लागू शकते असे उद्धव साहेब म्हणाले. त्यामुळे यावेळीही मुंबई महापालिकेवर भगवा फडकवायचा असा निर्धार आम्ही केला आहे. युती संदर्भात आम्हाला विचारणा केली, त्यावर आमचे म्हणणे आम्ही सांगितले. सध्या वातावरण अनुकूल आहे असे आमचे म्हणणे असल्याचेही आम्ही सांगितले. सध्या एकत्रित आंदोलन होत आहे, कार्यकर्ते देखील काम करत आहेत, असेही पाटील यांनी सांगितले.

## १६ विशेष सहाय्यक सरकारी...

सागर पोपटराव तडके, संतोष शेषराव कसबे, राहुल कैलास चव्हाण, सिमा बाळासाहेब झणझणे, तानुजसिंह युवराजसिंह ठाकुर, मुकुंद रामदास जावळे, वर्षा भिमराव उन्हाळे, सविता वसंत कामठे, सुनील सुभाष सोनवणे, अनिता पांडुरंग पोकळे, रेश्मा रईस तांबोळी, गितांजली बाबुराव जाधव, रूपाली हौशीराम शेळके, अरूण मारूती चांदणे यांचा समावेश आहे. तसेच प्रतिक्षा यादीमध्ये गोरक्षनाथ भगवानराव सांगळे, अराधना हरिनारायण चौधरी, पंकज साईनाथ राऊत, सुमित भरत भोज व नितीन बाबासाहेब मते यांचा समावेश आहे.

जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, निवड झालेल्या उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणीसाठी अहवाल पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त करून घेतला जाणार असून, त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत. तसेच, सदर यादी जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रदर्शित करण्यात येणार असून, या प्रक्रियेचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ सादर करावा, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## संत निवृत्तीनाथांची पालखी आज...

भाविक भक्त आणि ग्रामस्थ अंगणात सडा - रांगोळी घालुन पालखीचे वारकऱ्यांचा पेहराव करुन, डोक्यावर तुलसी वृंदावन घेऊन सवाद्य हरीनामाच्या जयघोषात स्वागत करतात.विशेष म्हणजे सर्वधर्मीय बांधव या सोहळ्यात सहभागी होऊन सामाजिक आणि धार्मिक ऐक्याचा अनोखा संदेश देतात.तसेच ठिकठिकाणी सामाजिक, धार्मिक, सहकारी संस्था आणि दानशूर मंडळीच्या योगदानातून वारकऱ्यांच्या चहापण, नाष्टा आणि जेवणाची,राहण्याची तसेच वैद्यकीय व्यवस्था करतात.त्यात विविध मान्यवर,कार्यकर्ते आणि संस्थांचा मौलिक सहभाग असतो.